# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 11.01.2025** **वार- शनिवार**

---

**सीडॅक**

केंद्रिय माहिती आणि प्रसारणमंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज पुण्यातील प्रगत संगणन विकास केंद्र अर्थात सीडॅक या संस्थेला भेट दिली आणि महासंगणक तंत्रज्ञान विकसनशीलतेच्या आणि अन्य औद्योगिक कंपन्यांना उपयुक्त इलेक्ट्रानिक उपकरणांच्या उत्पादनासाठी आवश्यक चीप आणि अन्य तांत्रिक उपकरणांच्या विकासाच्या संदर्भात सीडॅकमध्ये सुरू असलेल्या कामकाजाचा आढावा घेतला. सीडॅकनं विकसित केलेल्या तेजा जेएएस 64 या चीपचं आणि नोवा डेव्हलपमेंट बोर्डचं उद्घाटन वैष्णव यांच्या हस्ते झालं. यानंतर पत्रकारांशी संवाद साधताना अश्विनी वैष्णव म्हणाले की, इलेक्ट्रॉनिक कंपन्यांना आवश्यक असलेल्या चीप्स आणि सेमीकंडक्टर्स विकसित करण्यासाठी रांजणगांव इथं इलेक्ट्रानिक क्लस्टरची स्थापना करण्यात येणार आहे. पुणे नाशिक रेल्वेमार्गावरील नारायणगाव इथली जीएमआरटी या आंतरराष्ट्रीय प्रयोगशाळेवर 23 देश अवलंबून असल्यानं कोणत्याही परिस्थितीत ही वेधशाळा अन्य ठिकाणी हलवणार नाही अशी माहिती वैष्णव यांनी दिली.

**एफटीआयआय**

जग वेगानं बदलत असताना आपले विद्यार्थी मागे पडू नयेत यासाठी टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाचं विद्यापीठ बनवण्याचा केंद सरकारच्या मानस आहे. या संस्थेला विद्यापीठाचं बळ मिळालं तर अधिकारांचंही सक्षमीकरण होण्यासाठी मदत होईल, असं प्रतिपादन माहिती प्रसारण आणि रेल्वे खात्याचे केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज पुण्यात केलं.  टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया या संस्थेतील विद्यार्थ्यांशी त्यांनी संवाद साधला. तत्पूर्वी वैष्णव यांच्या हस्ते मुख्य ऑडिटोरियमचं उद्घाटन झालं. जुन्या चित्रपटांच्या छायाचित्रांचं प्रदर्शन, छायाचित्रणासाठी आवश्यक असणारी तांत्रिक सामग्रीची माहितीही त्यांनी यावेळी घेतली. केंद्रीय मंत्र्यांनी एफटीआयच्या आवारात फेरफटका मारत संस्थेची माहिती घेतली. यावेळी संस्था संचालक धीरज सिंह उपस्थित होते.

**दक्षिण कमांड**

भारतीय सेना स्वदेशीकरण तसंच अत्यधुनिकीकरण यामध्ये अग्रेसर असल्याचं लष्कराच्या दक्षिण विभागाचे प्रमुख लेफ्टनंट जनरल धीरज सेठ यांनी आज सांगितलं. 77 व्या लष्कर दिनाच्या पार्शवभूमीवर पुण्यात आयोजित दक्षिण विभागाच्या सन्मान सोहोळ्यात ते बोलत होते. या कार्यक्रमात सेठ यांच्या हस्ते विविध पदकं देऊन लष्करी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा गौरव करण्यात आला. तसंच 15 जानेवारी रोजी होणाऱ्या लष्कर दिन सोहोळ्याची रंगीत तालीम पार पडली. या कार्यक्रमाला माजी सैनिक तसच वीर पत्नी उपस्थित होत्या.

**बँड**

पुण्यात 15 जानेवारी रोजी होणाऱ्या 77 व्या लष्कर दिन सोहळ्यात नेपाळ लष्कराचा बँड पहिल्यांदाच सहभागी होणार आहे. लष्कर दिन सोहोळ्यात एकंदर 7 वाद्यवृंद सहभागी होणार आहेत. 33 जणांच्या नेपाळी वाद्यवृंदामध्ये 3 महिला संगीतकारांचा समावेश आहे.

**एचएमपीव्ही**

सर्व आरोग्य संस्थांमध्ये किमान पुढील तीन महिने पुरेल इतका औषधसाठा उपलब्ध ठेवावा आणि व्हेंटीलेटर्स, ऑक्सिजन प्लँट तसेच अन्य साधनसामुग्री सुस्थितीत असल्याबाबत खात्री करण्याचे निर्देश पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिले. तसेच ‘एचएमपीव्ही’ हा विषाणू नवीन नाही, त्यामुळं नागरिकांनी घाबरून जाऊ नये, असंही आवाहन त्यांनी केलं.

**लोकार्पण**

महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक विकासामध्ये अमूल्य योगदान देणाऱ्या व्यक्तींचे समग्र चरित्र दर्शन घडविणाऱ्या 'महाभूषण' या प्रकल्पातील संकेतस्थळाचं लोकार्पण आज ज्येष्ठ पत्रकार आणि 'ग्रंथाली'चे प्रणेते दिनकर गांगल यांच्या हस्ते पुण्यात करण्यात आलं.
1900 ते 1930 या दरम्यान जन्मलेल्या विविध क्षेत्रातील सुमारे 300 लोकांच्या चरित्रावर आधारित संकेतस्थळं या प्रकल्पाअंतर्गत 'व्हिजन महाराष्ट्र' या संस्थेमार्फत तयार करण्यात येत असून त्यातील ज्येष्ठ समाजवादी नेते एस. एम. जोशी यांच्यावरील संकेतस्थळाचं आज लोकार्पण झालं. नव्या पिढीला पूर्वसुरींचं योगदान माहीत व्हावं आणि जगाच्या कानाकोपऱ्यात कुठेही असलं तरीही त्याविषयीची विश्वासार्ह आणि इत्यंभूत माहिती मिळावी या हेतूनं हा प्रकल्प राबविण्यात येत असल्याचं गांगल यांनी यावेळी सांगितलं.

**कृषिक-2025-प्रदर्शन**

कृषी विज्ञान केंद्रामार्फत बारामती तालुक्यात शारदानगर इथं 'कृषिक-2025' हे जागतिक स्तरावरील कृषी प्रदर्शन 16 ते 20 जानेवारीदरम्यान आयोजित केलं आहे. ॲग्रिकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टचे प्रमुख राजेंद्र पवार यांनी ही माहिती दिली.

**फुले**

ॲग्री हॉर्टिकल्चर सोसायटी ऑफ वेस्टर्न इंडियाद्वारे 24 ते 27 जानेवारी दरम्यान पुण्यातील एम्प्रेस गार्डनमध्ये फुलांचं प्रदर्शन आयोजित करण्यात आलं आहे.  जपानी शैलीतील फुलांच्या सजावटी, रचना आणि स्पर्धकांनी बनवलेली बोन्साय झाडे, पुष्पप्रेमींसाठी आकर्षणाचं केंद्र असतील.

**निधन**

ज्येष्ठ पत्रकार, संगीत समीक्षक, लेखक मा. कृ. पारधी यांचं आज पहाटे पुण्यात निधन झालं. ते 104 वर्षांचे होते. मुंबईत दैनिक नवशक्ति, पुण्यात सकाळ, तरुण भारत आणि महाराष्ट्र हेराल्ड आणि दिल्ली इथं आकाशवाणीच्या वृत्तसेवा विभागात त्यांनी काम केलं. केंद्रीय माहिती सेवेतून ते 1978 मध्ये निवृत्त झाले. निवृत्तीनंतरही पारधी यांनी 2016 पर्यंत वृत्तपत्रीय समीक्षालेखन केलं.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**